| निविदा क्रमांक | |
|---|---|

# महाराष्ट्र शासन

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

### जिल्हाधिकारी कार्यालय,

### (पुरवठा शाखा ) जळगांव

### अन्नधान्य व इतर जिवनावश्यक वस्तु वाहतुक करणेबाबत

### निविदा

कालावधी सन २००९-२०१२

दि १५.१२.२००९ ते १४.१२.२०१२

**कामाचे नांवः- आंतर जिल्हा व जिल्हा अंतर्गत वाहतुक**

जळगांव जिल्हयातील किंवा जिल्हया बाहेरील भारतीय,खाद्य निगमच्या कोणत्याही डेपोपासुन किंवा कोणत्याही शासकीय/निमशासकीय/खाजगी/भाडयाच्या गोदामापासुन किंवा कोणत्याही रेल्वे स्थानकापासून ते जळगांव जिल्हयातील कोणत्याही शासकीय/ निमशासकीय/खाजगी/भाडयाच्या गोदामापर्यंत अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंची वाहतुक करणे व उलट वाहतुक करणे.

० शासकीय गोदामाचे ठिकाण ०

जळगांव,एंरडोल,धरणगांव,जामनेर,भुसावळ, वरणगांव,यावल,किनगांव,बोदवड,रावेर,सावदा, मुक्ताईनगर, कु-हा,पाचोरा,चाळीसगांव,भडगांव,अमळनेर, पारोळा, चोपडा.

# अन्नधान्य व इतर जिवनावश्यक वस्तु वाहतुक करणे बाबत

## अनुक्रमणिका

### कामाचे नांवः- आंतर जिल्हा व जिल्हा अंतर्गत वाहतुक

o शासकीय गोदामाचे ठिकाण o

जळगांव,एंरडोल,धरणगांव,जामनेर,भुसावळ, वरणगांव,यावल,किनगांव,बोदवड,रावेर,सावदा, मुक्ताईनगर, कु-हा,पाचोरा,चाळीसगांव,भडगांव,अमळनेर, पारोळा, चोपडा

निविदा फार्म कोणास दिले :-

-------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------

---

दिल्याचा दिनांकः-

जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगांव.

# जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव
# अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचे वाहतूकीकरीता निविदा सूचना
# अटी व शर्ती

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांचे वतीने व करीता अपर जिल्हाधिकारी,जळगांव हे अनुभवी वाहतुक कत्रांटदाराकडून जिल्हा अंतर्गत व आंतर जिल्हा अन्नधान्य व इतर जीवनावश्यक इत्यांदीची वाहतुक ( भूमार्गाने) करण्यासाठी सन २००९-२०१२ साठी (दिनांक १५/१२/२००९ ते १४/१२/२०१२ दोन्ही दिवस धरुन ) या कालावधीसाठी संपूर्ण जिल्हयासाठी एक च मोहरबंद निविदा मागवित आहे.

निविदा स्विकारण्याचा अंतीम दिनांक २६/११/२००९ दुपारी २.०० वाजेपर्यंत राहिल प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २६/११/२००९ दुपारी ४.०० वाजता अपर जिल्हाधिकारी, जळगांव यांचे समक्ष किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यासमोर उघडण्यात येतील.त्यावेळी इच्छुक निविदाकारास किंवा त्याच्या प्रतिनिधीस उपस्थित राहता येईल.निविदा उघडण्याची तारीख बदलली जाऊ शकते.

निविदा नमुना व त्यातील अटी व शर्ती जिल्हा पुरवठा अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव ( पुरवठा शाखा) यांचे कार्यालयामध्ये कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत दिनांक ५/११/२००९ ते १९/११/२००९ या कालावधीत मिळतील. निविदेची किंमत रुपये १०,०००/- परत न मिळणारी रक्कम चलनाने ०४०८-अन्न साठवणूक व वखार -८०० इतर जमा रक्कम ( ०३) या लेखाशिर्षाखाली भरुन त्याची प्रत सादर केल्यावरच निविदा देण्यात येईल. ( मनीऑर्डरने पाठविलेली रक्कम स्विकारली जाणार नाही )

## १) कंत्राट कालावधी व मुदतवाढ

(i) निविदाप्रक्रीयेतील ज्या निविदाकाराचे दर स्विकारण्यात येतील त्या निविदाकारासोबत तीन वर्षाच्या कालावधीकरीता वाहतुकीचा करारनामा करण्यात येईल. निविदाकाराशी ज्या तारखेस करारनामा करण्यात येईल क्ष्या तारखेला कंत्राटाचा कालावधी सुरु होऊन तो पुढील तीन वर्षापर्यंत असेल.

(ii) तीन वर्षाचा कंत्रांट कालावधी संपल्यानंतर सुध्दा जर नवीन कंत्राट कालावधी काही अनिवार्य परिस्थितीमुळे निश्चित करता आला नाही तर,कंत्राटाचा कालावधी दोन महिन्यापर्यंत अपर जिल्हाधिकारी,जळगांव वाढवू शकतील.

(iii) वाढीव २ महिन्याच्या कालावधी नंतरही काही अपरिहार्य कारणास्तव पुढील कालावधीकरीता कंत्राट शक्य नसल्यास त्या कालावधीपर्यंत कंत्राटाचा कालावधी वाढविण्याबाबतचा निर्णय परिस्थितीनुरुप शासनस्तरावर घेण्यात येईल.

## २) <u>जिल्हयातील वाहतूकीच्या अंतराचे टप्पे व आधारभूत दर खालील प्रमाणे आहेत</u>

| टप्पा | कि.मी. | आधारभूत दर ( Base rate) |
|---|---|---|
| १ | ० ते २ कि.मी | रु. ३० प्रति टन ( संपूर्ण अंतराकरीता ) |
| २ | २ ते १० कि.मी. | रु. ६ प्रति टन प्रति कि. मि. |
| ३ | १० ते ५० कि.मी. | रु.४.८० प्रति टन प्रति कि.मी. |
| ४ | ५० कि.मी.च्या पुढे | रु. ३ प्रति टन प्रति.कि.मी. |

निविदा भरतांना संपूर्ण जिल्हयासाठी एकच निविदा जिल्हास्तरावर भरणे आवश्यक आहे.एका व्यक्तीस एकच निविदा भरता येईल.संपूर्ण वाहतुकीकरीता आधारभूत दराच्या टक्क्वारीवर टक्के निहाय वेगवेगळे दर न देता सर्व टप्प्याकरीता एकच दर मुळ दराच्या कमी/अधिक टक्केवारीमध्ये नमूद करणे आवश्यक राहील.

## ३) <u>टप्पेनिहाय देयकांची अदायगी</u>

(i) वाहतुकीच्या अंतरानुसार वाहतूक देयकाची परिगणना टप्पेनिहाय करण्यात येईल.उदा.एखादया वाहनाने ९ मे.टन.धान्याची वाहतूक १०० कि.मी.झाली असल्यास खालील प्रमाणे टप्पेनिहाय अंतराची परिगणना करुन देयके अदा करण्यात येईल.

| धान्य वाहतुकीचे टप्पे ( किं.मी.) | आधारभूत दर | होणारी वाहतुक ( कि.मी ) | धान्य वाहतुक ( मे.टन ) | देयके ( रुपये ) |
|---|---|---|---|---|
| ० ते २ कि.मी | रु. ३० प्रति टन ( संपूर्ण अंतराकरीता ) | ०-२ | ९ | रु २७०/- |
| २ ते १० कि.मी. | रु. ६ प्रति टन प्रति कि. मि. | ८ | ९ | रु.४३२/- |
| १० ते ५० कि.मी. | रु.४.८० प्रति टन प्रति कि.मी. | ४० | ९ | रु.१७२८/- |
| ५० कि.मी.च्या पुढे | रु. ३ प्रति टन प्रति.कि.मी. | ५० | ९ | रु १३५०/- |
| | एकुण | १०० | ९ | रु.३७८०/- |

टिप :- एकुण १०० कि.मी.झालेली वाहतुक चार टप्प्यामध्ये पुढील प्रमाणे विभागण्यात आली आहे. २ कि.मी. ( पहिला टप्पा ) + ८ कि.मी. ( दुसरा टप्पा ) + ४० कि.मी. ( तिसरा टप्पा ) + ५० कि.मी. ( चौथा टप्पा )

(ii) जेवढी कि.मी.वाहतुक झाली असेल तेवढे कि.मी.चार टप्प्यामध्ये विभागण्यात यावेत.उदा.एकुण ३८ कि.मी.झालेली वाहतुक चार टप्प्यामध्ये पुढील प्रमाणे विभागण्यात आली आहे. २ कि.मी. (पहिला टप्पा ) + ८ कि.मी. ( दुसरा टप्पा ) + २८ कि.मी. ( तिसरा टप्पा ) + ० कि.मी. ( चौथा टप्पा ),

(iii) वाहतुक कंत्राटदाराने किमान ९ मे.टन. वाहनभार क्षमतेचे वाहन वाहतूकीकरीता वापरणे आवश्यक राहील.वाहतुक कंत्राटदार वाहन भार क्षमतेनुसार ९ मे.टन अथवा त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या वाहनाने वाहतुक करु शकेल व त्यानुसार देयके अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(iv) पहिल्या ० ते २ कि.मी. च्या टप्प्याकरीता संपूर्ण अंतराकरीता रु. ३० प्रति टन दर निश्चित करण्यात आला आहे.एका शहरातून/ गावातून दुस-या शहरात/गावात होणारी एखादी संपूर्ण वाहतुक २ कि.मी.पेक्षा कमी अथवा जास्तीत जास्त २ कि.मी.झाली असल्यास पुढील सुत्राप्रमाणे देयके अदा करण्यात येतील.

वाहनभार क्षमतेनुसार झालेली एकुण मे.टनातील वाहतुक **X** ३० = देयके ( रुपयात )

(v) एकाच शहरातील/ गावातील वाहतूकीसाठी सुध्दा संदर्भ बिंदू ते संदर्भ बिंदू अंतर लागू असल्याने,एकाच शहरातील/ गावातल्या गावातील वाहतूक २ कि.मी.पेक्षा कमी,२ कि.मी. अथवा २ कि.मी.पेक्षा कितीही जास्त असले तर, टप्पेनिहाय अंतराची परिगणना न करता पुढील प्रमाणे देयके अदा करण्यात येतील.

वाहनभार क्षमतेनुसार झालेली एकुण मे.टनातील वाहतुक **X** ३० = देयके ( रुपयात )

(vi) कुठेही गोदाम ते गोदाम अंतराची परिगणना करुन वाहतूकीची देयके अदा करण्यात येणार नाहीत.

(vii) वाहतूक कंत्राटदारांना वाहतूक पासच्या आधारे नियमित महिनानिहाय देयके जिल्हा कार्यालयास सादर करावी लागतील.

## ४) वाहतुकीची अंतरे प्रमाणित करणे

(i) वाहतुकीची अंतरे शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या यंत्रणेकडुन प्रसिध्द केलेल्या वाहतुकीच्या अद्यावत Table of Distance या पुस्तिकेतुन घेण्यात येतील.

(ii) वाहतुकीच्या अंतरासाठी अद्यावत Table of Distance ही पुस्तिका उपलब्ध नसल्यास किंवा या पुस्तीकेत अंतरे प्रसिध्द केली नसल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सक्षम अधिका-याकडुन अंतरे प्रमाणित करुन घेण्यात येतील.

(iii) सदर वाहतुकीची अंतरे सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या संदर्भ बिंदूपासुन संदर्भ बिंदूपर्यंत ( Zero Point to Zero Point) व जवळच्या मार्गाने प्रमाणित करण्यात येतील.

(iv) कंत्राट कालावधीदरम्यान वाहतुकीकरीता जवळचे नवीन मार्ग तयार झाल्यास अशा जवळच्या मार्गावरील अंतर प्रमाणित करुन घेवून असे नवीन मार्ग वाहतुकीकरीता उपयोगात आणण्यात येतील.

(v) एकाच शहरातील/गावातील वाहतुकीसाठी सुध्दा संदर्भ बिंदू ते संदर्भ बिंदूपर्यंत प्रमाणित केलेल्या अंतरानुसार म्हणजेच अंतराचा पहिला टप्पा ० ते २ कि.मी. या टप्पयातील वाहतुकीचे अंतर विचारात घेण्यात येईल.

## ५) देयकाचे प्रदान

(i) वाहतुकीची अंतरे प्रमाणित झाली नसतील अशा वेळी तात्पुरत्या ग्राहय धरलेल्या अंतराच्या आधारे वाहतुकीच्या देयकाचे परिगणना करुन देय ठरणा-या रकमेतुन वाहतुक तुट, आयकर कपात करुन उर्वरित रकमेच्या ७५ टक्के एवढी रक्कम आगाऊ प्रदान करण्यात येईल. सदर रक्कम वाहतुक करण्यात आलेले अन्नधान्य निर्देशित ठिकाणी पोहचल्याची खातरजमा करुन आदा करण्यात येईल.

(ii) वाहतुकीची अंतरे लवकरात लवकर प्रमाणित करुन घेवून, प्रमाणित अंतरानुसार पुन्हा वाहतुकीच्या देयकाचे परिगणना करुन उर्वरित रक्कम समायोजित करुन प्रदान करण्यात येईल.

## ६) मालकीच्या व नियंत्रणाखालील आवश्यक वाहनांची ( ट्रकची) संख्या

(i) निविदाधारकाकडे जिल्हयातील तालुक्यांच्या संख्येएवढे म्हणजे १५ ( पंधरा ) मालकीचे व तेवढेच नियंत्राखालील किमान ९ मे.टन. वाहनभार क्षमतेची वाहने निविदा सादर करण्यापूर्वी उपलब्ध असावीत.

(ii) भागीदार संस्था ( Partnership Firm/ Society),सहकारी संस्थाच्या (Co operative Society/ Firm ) बाबतीत भागिदार (Partner ) / संचालक ( Director ) सभासदांच्या ( Member ) नावे असलेले ट्रक हे त्या भागीदारी संस्था /सह संस्थांच्या मालकीची वाहने म्हणून विचारात घेण्यात यावेत.संबंधित भागीदार/संचालक/सभासद वाहतूकीच्या संपूर्ण कंत्राट कालावधीकरीता वाहने उपलब्ध करुन देतील,अशा आशयाचे भागीदार /संचालक/सभासद यांचे शपथपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील.

(iii) निविदाधारक खाजगी व्यक्ती Private Firm/Properitery Firm असल्यास,निविदेसोबत सादर केलेले मालकीची वाहने खुदद त्या खाजगी व्यक्तीच्या नावे असणे आवश्यक राहील.तसेच वरील ‘’अ ‘’ येथे निश्चित केलेल्या संख्येइतकी मालकीची वाहने असल्याबाबतचे शपथपत्र निविदाधारक खाजगी व्यक्तीने सादर करणे आवश्यक राहील.

(iv) सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत धान्य पुरवठा खंडीत होवू नये व स्थलकालपरत्व्ये कोणत्याही क्षणी धान्याची त्वरेने उचल/ वाहतूक होण्याकरीता निविदाधारकाची मालकीची वाहने असणे अत्यावश्यक ठरते. सबब वरील ‘’ i ‘’ येथे निश्चित केलेल्या संख्ये एवढे मालकीची वाहने निविदाधारकाचे नावे असणे आवश्यक आहे.मालकीची नावे नसणा-या भागीदारी संस्था/सहकारी संस्था/ खाजगी व्यक्ती अशा निविदाधारकांची निविदा ग्राहय धरण्यात येणार नाही.

(V) वरील ‘’ i ‘’ येथे निश्चित केलेल्या मालकीच्या वाहनांची संख्या व नियंत्रणाखालील वाहनांची संख्या या दोन्हीच्या बेरजेएवढी वाहने एखाद्या भागीदारी संख्या / सहकारी संस्था / खाजगी व्यक्तीच्या नावे मालकीचे असल्यास, ‘’ i ‘’ येथे निश्चित केलेल्या संख्यऐवढी नियंत्रणाखाली स्वतंत्र वाहने असण्याची आवश्यकता नाही. मात्र, वरील ‘’ i ‘’ प्रमाणे मालकीच्या वाहनांची संख्या व नियंत्रणाखालील वाहनांची संख्या यांच्या बेरजेएवढे

निविदाधारकाकडे मालकीची वाहने नसल्यास, निविदाधारकाकडे जिल्हयातील तालुक्यांच्या संख्येएवढे म्हणजे १५ ( पंधरा ) मालकीचे व तेवढेच नियंत्रणाखालील वाहने असणे आवश्यक राहील. तथापि वरील कोणत्याही परिस्थितीत आवश्यकतेनुसार अतिरिक्त वाहने उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी वाहतुक कंत्राटदाराची राहील.

(vi) नियंत्रणाखालील वाहने संपुर्ण कंत्राट कालावधीकरीता उपलब्ध करुन देण्यात येतील, अशा आशयाचे सर्व संबधित वाहन मालकांचे शपथपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील.

(vii) निविदेसोबत सादर करण्यात येणा-या मालकीच्या व नियंत्रणाखालील वाहनांच्या मालकीबाबत व ते संपुर्ण कंत्राट कालावधीकरीता वापरण्यास योग्य असल्याबाबत सक्षम परिवहन अधिका-याच्या प्रमाणपत्राची (R.C.Book with Fitness Certificate) साक्षांकित केलेली सत्यप्रत निविदेसोबत जोडण्यात यावी.

(viii) निविदे सोबत सादर केलेले स्वतःच्या मालकीची वाहने व नियंत्रणाखालील वाहने दुस-या जिल्हयातील तसेच इतर कोणत्याही वाहतुकीच्या कंत्राट / करारनाम्यासाठी संपुर्ण कंत्राट कालावधीदरम्यान उपयोगात आणले/ आणणार नसल्यासंबंधी शपथपत्र जोडणे आवश्यक आहे.

(ix) करारनामा करतेवेळी किंवा करारनामा झाल्यानंतर निविदाधारकाने सादर केलेले मालकीचे व नियंत्रणाखालील वाहने, अन्य जिल्हयातील अन्नधान्य तसेच इतर कोणत्याही वाहतुकीच्या कंत्राट / करारनाम्यासाठी उपयोगात आणले असल्याचे आढळुन आल्यास कंत्राट रद्द करण्याची कारवाई शासनस्तरावरुन करण्यात येईल.

(x) वरील ‘’ i ‘’ येथे निश्चित केलेल्या संख्येएवढे मालकीचे व नियंत्रणखालील वाहने कंत्राटदाराकडे कंत्राटाच्या पुर्ण कालावधीसाठी असणे आवश्यक आहे. माल वाहतुकीसाठी उपयोगात येणा-या वाहनाव्यतिरिक्त कोणतेही वाहन ग्राहय धरण्यात येणार नाही.

(xi) निविदाकारांकडे उपलब्ध असावयाच्या मालकीच्या व नियंत्रणाखालील वाहनांच्या संख्या निश्चित करण्यात आली असली तरी धान्याची वाहतुक विहीत वेळेत पुर्ण करण्याची व त्यासाठी आवश्यक असल्यास अतिरिक्त वाहने उपलब्ध करुन काम पुर्ण करण्याची सर्वस्वी जबाबदारी वाहतुक कंत्राटदाराची असेल. जळगांव जिल्हयातील तालुक्यांची संख्या, गोदामांची संख्या, जळगांव जिल्हयाचे मासिक/वार्षिक अन्नधान्य नियतन व ते उचल करण्याचा कालावधी

विचारात घेता दररोज ९ मे.टन क्षमतेचे कमीत कमी ६० ट्रक्स किंवा मागणीनुसार त्यापेक्षा जास्त ट्रक्स कंत्राटदारास उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

(xii) निविदाधारकाने सादर केलेली मालकीचे/नियंत्रणाखालील/अतिरिक्त उपलब्ध करुन दिलेली वाहने परराज्यात नोदणी झालेले असल्यास, सदरच्या वाहनांना कंत्राट कालावधीत महाराष्ट्र राज्यात वाहतुक करण्यास परिवहन खात्याने परवानगी दिली असल्याची कागदपत्रे वाहतुक कंत्राटदाराने अपर जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केल्यानंतर व अशी कागदपत्रे प्राप्त झाली असल्याची खातरजमा करुन अशी वाहने वापरण्यास परवानगी देण्यांत येईल.

(xiii) निविदेसोबत भागीदारी फर्म / सहकारी संस्थाचा नोंदणी दाखला, नियमावली व भागीदारी पत्रक जोडणे आवश्यक आहे.तसेच फर्मचे भागीदार,सदस्य ( Member)संचालक ( Director )यांची नावे अधिकृत असल्याबाबतची कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

## ७) <u>अनुभव प्रमाणपत्र Experience Certificate</u>

(i) वाहतुकीची निविदा सादर करण्यासाठी केंद्र शासन, राज्य शासन अथवा निमशासकीय कार्यालये / संस्थेच्या वाहतुकीच्या कामाचा २ वर्षाचा अनुभव अनिवार्य आहे.

(ii) केंद्र शासन, राज्य शासन व निम शासकीय कार्यालये / संस्थांकडील सर्व प्रकारच्या वस्तुंच्या (उदा. अन्नधान्य, लेव्ही साखर, सिमेंट,खत,कापूस,रुईच्या गाठी इत्यादी) वाहतुकीचा अनुभव विचारात घेण्यात येईल.

(iii) वाहतुकीचा अनुभव वार्षिक ४१,००० मे.टन वाहतुकीचा असावा.

(iv) भागीदारी/सहकारी संस्थाचे भागीदार/संचालक /सभासद यांच्या नावे असलेली अनुभवाची प्रमाणपत्रे ग्राहय धरण्यात येतील.

(v) खाजगी व्यक्तीकडे केलेल्या वाहतुकीच्या कामाचा अनुभव विचारात घेण्यात येणार नाही.

## ८) <u>बँक गॅरंटी Bank Guarantee</u>

(i) निविदेसोबत बँक गॅरंटी जोडण्याची आवश्यकता नाही. मात्र, ज्या निविदाकाराची निविदा मंजूर होईल त्या निविदाकाराकडुन करारनामा करण्यापुर्वी साडेतीन वर्षाची रु. ५७,००,०००/- (रुपये सत्तावन्न लाख मात्र ) ची मुळ बँक गॅरंटी घेण्यात येईल.

(ii) बँक गॅरंटी ही केवळ अनुसुचित अथवा राष्ट्रीयकृत बँकेची घेण्यात येईल.

## ९) **महसुल ऐपत प्रमाणपत्र Solvancy Certificate**

(i) निविदेसोबत महसुल ऐपत प्रमाणपत्र घेण्यात येणार नाही. मात्र, ज्या निविदाकाराची निविदा मंजूर केली आहे त्या निविदाकाराकडुन करारनामा करण्यापुर्वी रक्कम रु.७६,००,०००/- (अक्षरी रुपये शहात्तर लाख मात्र ) चे मुळ महसुल ऐपत प्रमाणपत्र घेण्यात येईल. महसुल ऐपत प्रमाणपत्र वाहतुक कंत्राटाच्या पुर्ण कालावधीसाठी आवश्यक असल्याने, त्यांची वेळोवेळी मुदत वाढवुन घेण्याची जबाबदारी संबंधित वाहतुक कंत्राटदाराची राहील. ज्या निविदाकाराची निविदा मंजूर केली आहे, त्या निविदाधारकास महसुल ऐपत प्रमाणपत्रात नमूद केलेली स्थावर मालमत्ता कंत्राट कालावधीपर्यंत (वाढीव कालावधीसह) शासनाच्या परवानगीशिवाय विकता येणार नाही, अशा आशयाचे शपथपत्र करारनामा करतेवेळी द्यावे लागेल.

(ii) महसूल ऐपत प्रमाणपत्र भागीदाराच्या नावाने किंवा सहकारी संस्थेच्या संचालकाच्या/ सभासदाच्या नावाने किंवा दुस-या व्यक्तीच्या नावाने असल्यास, महसूल ऐपत प्रमाणपत्रधारकाला रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर सर्वदायीत्व, संयुक्तपणे व पथकपणे जबाबदार असल्याचे संमतीपत्र लिहुन दयावे लागेल.

(iii) संबधित निविदाधारकाने मुळ महसूल ऐपत प्रमाणपत्र न दिल्यास त्यांचेकडून साडे तीन वर्ष कालावधीची अनुसूचित अथवा राष्ट्रीयकृत बँकेची अतिरिक्त बॅक गॅरन्टी घेण्यात येईल.

(iv) महसूल ऐपत प्रमाणपत्र/अतिरिक्त बँक गॅरन्टी रु. ७६,००,०००/- ( अक्षरी रुपये शहात्तर लाख मात्र ) ऐवढी रकमेची घेण्यात येईल.

## १०) **इसा-याची रक्कम**

(i) निविदे सोबत इसारा रक्कम रुपये ३८,००,०००/- (अक्षरी अडोतीस लाख मात्र) चलनाव्दारे भारतीय स्टेट बँकेत लेखाशिर्ष ८४४३- के,नागरी ठेवी ( १०१) महसूली ठेवी या लेखाशिर्षाखाली भरून चलन निविदे सोबत सादर करावे.

(ii) इसा-याची रक्कम चलनाव्दारे अथवा “ अपर जिल्हाधिकारी,जळगांव “यांचे नावे दर्शनी हुंडीव्दारे **( Demand Draft )** सुध्दा भरता येईल.इसा-याची रक्कम निविदा सादर करण्यापूर्वी चलनाव्दारे भरुन,त्याची प्रत किंवा दर्शनी हुंडी **( Demand Draft )** निविदे

सोबत सादर करण्यात यावी.दर्शनी हुंडी ( Demand Draft )हि केवळ अनुसूचित किंवा राष्ट्रीयकृत बँकेची असणे आवश्यक आहे.

(iii) ज्यांनी इसारा रक्कम भरलेली असेल, त्यांना निविदा भरणे बंधनकारक आहे.निविदा न भरल्यास त्यांची इशा-याची संपूर्ण रक्कम जप्त करण्यात येईल.

(iv) विनिर्दिष्टीत केलेल्या इसारा रकमेपेक्षा कमी रक्कम भरणा-या निविदाधारकाची निविदा अपात्र ठरवून भरलेली संपूर्ण रक्कम जप्त करण्यात येईल.

(v) निविदा उघडल्यानंतर प्रथम न्यूनतन निविदाकार व व्दितीय न्यूनतन निविदाकाराव्यतिरिक्त उर्वरीत सर्व पात्र/अपात्र निविदाधारकांची इसारा रक्कम सात दिवसात परत करण्यात येईल.प्रथम न्यूनतन निविदाकाराशी करारनामा झाल्यानंतर उर्वरीत निविदाधारकाची इसारा रक्कम सात दिवसात परत करण्यात येईल.

## ११) <u>प्रतिभूती ठेवी रक्कम</u> <u>( Security Deposit )</u>

ज्या निविदाकाराची निविदा मंजुर केली आहे.त्या निविदाकारास प्रतिभूती ठेवीची रक्कम रुपये ३८,००,०००/- ( अक्षरी रुपये अडोतीस लाख मात्र ) भरावी लागेल.त्यापैकी ५० टक्के रक्कम करारनामा करण्यापूर्वी जमा करावी लागेल.व उर्वरीत ५० टक्के रक्कम प्रत्येक महिन्याच्या देयकातून १० टक्के प्रमाणे ( ५ हप्त्यात ) कपात करुन देण्याची मुभा राहील.वाहतूक कंत्राटदाराच्या इच्छेनुसार इसा-याची संपुर्ण रक्कम प्रतिभूती ठेवीमध्ये परिवर्तीत करण्यास मुभा राहील.

## १२) <u>निविदा पध्दती - व्दि लिफाफा पध्दती</u>

(i) निविदा पध्दती हि उद्योग,उर्जा व कामगार विभागाच्या क्र.: भाखंस/१०९४/(२०७९) उद्योग ६ दिनांक ३०/३/१९९४ च्या शासन निर्णयानुसार व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणानुसार व्दि लिफाफा पध्दतीचा अवलंब करण्यात येत असल्याने निविदा २ लिफाफ्यामध्ये सादर करण्यात यावी.

(ii) व्दि लिफाफ्यापैकी लिफाफा “अ “ तांत्रिक लिफाफा व “ब “ वाहतुक दराचा (व्यापारी दराचा ) लिफाफा राहील.सदर दोन्ही लिफाफे स्वतंत्र लिफाफ्यात मोहोरबंद करण्यात यावेत.तांत्रिक लिफाफा “अ “हा मागविण्यात आलेली सर्व कागदपत्रे,निविदेमधील सर्व अटी व

शर्तीची पुर्तता करणारा राहील तर,लिफाफा "ब " हा वाहतूक दराचा ( व्यापारी दराचा ) राहील.

(**iii**) **लिफाफा** "ब " मध्ये निविदाधारकाने आधारभूत दराच्या टक्केवारीवर वाहतूकीचे दर नमूद करावेत.वाहतूकीचे दर टप्पेनिहाय वेवगवेगळे न देता सर्व टप्प्याकंरीता एकच दर टक्केवारी मध्ये नमुद करावा.

(**iv**) **तांत्रिक लिफाफा** "अ " मधील कागदपत्रांची पुर्तता निविदा सादर करतांना पुर्ण करण्यात यावी.तांत्रित लिफाफा उघडल्यानंतर ऐनवेळी कागदपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत.तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रात व अटी शर्ती नमूद केलेल्या अर्हतेपेक्षा कमी अर्हता आढळयास निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

(v) तथापी शासनाला स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी ख-याखु-या निविदाकारांना जास्तीत जास्त संख्येने निविदामध्ये सहभागी होण्याची संधी देणे आवश्यक आहे.हा दृष्टीकोण ठेवून विहित केलेल्या अत्यावश्यक कागदपत्रामध्ये काही किरकोळ स्वरुपाच्या त्रुटी असतील ( उदा. स्वाक्षरी,शपथपत्रे स्वाक्षंकित नसलेली कागदपत्रे इ. ) व अशा त्रुटींची पुर्तता करणे शक्य असल्यास,व्यापारी लिफाफा उघडण्यापूर्वी अशा त्रुटींची पुर्तता करण्याची परवानगी निविदेकारांना देण्यात येईल.अशा त्रुटी तात्काळ पुर्ण करता आल्या नाहीतर मात्र ती निविदा अपात्र ठरवण्यात येईल.

(vi) निविदाप्रक्रीयेदरम्यान तांत्रिक लिफाफा "अ " उघडल्यानंतर लिफाफा "ब " वाहतूक दराचा ( व्यापारी दराचा ) उघडण्यापूर्वी कोणत्याही निविदाधारकांचे तांत्रिक लिफाफा संदर्भात कोणतेही आक्षेप असल्यास त्या निविदाधारकांना आक्षेप लेखी द्यावेत,कोणत्याही परस्थितीत तोंडी आक्षेप मान्य करण्यात येणार नाहीत.

(vii) निविदाप्रक्रियेदरम्यान तांत्रिक लिफाफा "अ " उघडल्यानंतर निविदाधारकाचे तांत्रिक लिफाफा संदर्भात आक्षेप नसल्यास सर्व पात्र व अपात्र निविदाधारकांकडून आक्षेप नसल्याबाबत तसे लेखी घेण्यात येईल.

(viii) लिफाफा "ब "उघडल्यानंतर तांत्रिफ लिफाफा "अ "संदर्भात कोणतेही आक्षेप मान्य करण्यात येणार नाहीत.

(ix)प्राप्त लेखी आक्षेपांची शासन निर्णय क्रमांक : कंत्राट १००९/६१४/प्र.क्र.४७/ना.पु.१६ अ, दिनांक : २१ जुलै २००९ मधील तरतुदीनुसार छाननी करुन पुढील योग्य कार्यवाही करण्यात येईल.जेणेकरुन निविदाप्रक्रिया पुर्ण करण्यात कोणताही कालापव्यय होणार नाही.

(x) निविदाधारकांकडून लिफाफा "अ " म्हणजेच तांत्रिफ लिफाफ्यात आवश्यक असलेली कागदपत्रे सादर न केल्यास सदरची निविदा अपात्र ठरविण्यात येईल.अशा निविदेचा लिफाफा "ब " ( वाहतुक दर ) उघडण्यास अपात्र ठरत असल्याने,संबंधित निविदाधारकाची लिफाफा "ब " उघडण्याची व त्यातील दर विचारात घेण्याची लेख्री किंवा तोंडी आग्रह/विनंती कोणत्याही परिस्थितीत ग्राहय धरण्यात येणार नाही.

(xi) लिफाफा "ब " मध्ये फक्त दर टक्केवारीमध्ये शाईने हस्ताक्षरात स्पष्टपणे दिसेल अशा प्रकारे अंकी व अक्षरी नमुद करण्यात यावेत.दराची छायांप्रत् ग्राहय धरण्यात येणार नाही.

(xii) निविदा अथवा निविदेमध्ये कोणतीही अट अथवा पर्याय निविदाधारकास देता येणार नाही.अशा अटीयुक्त निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

(xiii) तांत्रिक लिफाफा "अ " उघडल्यानंतर ३ पेक्षा कमी ग्राहय निविदा प्राप्त झाल्यास, वाहतूक दराचा लिफाफा "ब " उघडण्यात येणार नाही व निविदेच्या अल्प प्रतिसादामुळे निविदा सादर करण्यास पुन्हा १५ दिवसाची पहिली मुदतवाढ देण्यात येईल. यावेळीही ३ पेक्षा कमी ग्राह निविदा प्राप्त झाल्यास,निविदा सादर करण्यास पुन्हा १५ दिवसाची दुसरी मुदतवाढ देण्यात येईल.

(xiv) तांत्रिक लिफाफा "अ " मध्ये प्राप्त ठरलेल्या निविदाधारकास,पहिल्या व दुस-या मुदतवाढीनुसार निविदा सादर करण्याच्या दिनांकास व वेळी वाहतुक दराचा लिफाफा "ब " सादर करता येईल.अशा निविदाधारकाचे दराचे सर्व "ब " लिफाफे उघडण्यात येतील व त्यावर विचार करण्यात येईल.

(xv) निविदेसोबत सादर करावयाची सर्व कागदपत्र <u>राजपत्रित अधिका-याकडून साक्षांकित</u> केली असणे आवश्यक आहे.निविदा उघडते वेळी,साक्षांकित केलेल्या कागदपत्रांच्या मुळप्रती सादर करणे संबंधितास बंधनकारक आहे.

(xvi) अंतिम दिनांक व विहित वेळेनंतर प्राप्त झालेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

(xvii) जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ खाली ज्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल होऊन दंड अथवा शिक्षा झाली असल्यास, अशा व्यक्तींना तसेच,भागीदारी संस्था/सहकारी संस्थांना शिक्षेच्या कालावधीत वाहतूक निविदेत भाग घेता येणार नाही. जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ खाली गुन्हा दाखल होवून दंड अथवा शिक्षा झाली असल्यास / नसल्यास त्यासंबंधीचे शपथपत्र निवेदेसोबत सादर करण्यात यावे.

(xviii) निविदा फॉर्म सोबत शासन निर्णय क्र : कंत्राट १००९/६१४/प्र.क्र.४७/ना.पु.१६ अ, मंत्रालय विस्तार,मुंबई- ४०००३२ दिनांक : २१ जुलै २००९ ची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(xix) निविदाधारकाने शासन निर्णयातील सर्व तरतूदी लक्षात घेवून निविदेत दर नमूद करावेत.मागाहून बदलाबाबतची विनंती अथवा कोणत्याही प्रकारच्या तक्रारींची दखल घेण्यात येणार नाही.

(xx) उद्योग,उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखंस-१०९४/( २६७९) /उद्योग-६ दिनांक २/१/१९९२ नुसार तांत्रिक लिफाफा "अ " मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी **परिशिष्ट - अ** मध्ये सोबत जोडण्यात आलेली आहे.

## १३) <u>निविदेतील दराची विधी ग्राहयता</u>

निविदा उघडल्यानंतर दराबाबतचा कोणताही बदल स्विकारण्यात येणार नाही.सर्व निविदाकारांची दरपत्रके निविदा उघडण्याच्या तारखेपासून १२० दिवस विधीग्राहय राहतील.मात्र या कालावधीमधून निविदाप्रक्रियेबाबत न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्यासाठी लागणारा कालावधी वगळण्यात येईल.

## १४) <u>जिल्हास्तरावर दर मंजुरी/ दर मंजुरीकरीता शासनाकडे शिफारस</u>

(i) निविदेमध्ये प्राप्त प्रथम न्युनत्तम निविदाकारासोबतच वाटाघाटी करण्यात येईल.

(ii) वाटाघाटीमध्ये आधारभूत दरापेक्षा जास्त दर प्राप्त झाले असतील व ते वाजवी वाटत असल्यास अशा निविदा अंतीम करण्यापूर्वी शासनाची मान्यता घेण्यात येईल.

(iii) वाटाघाटीमध्ये आधारभूत दरापेक्षा जास्त दर प्राप्त झाले असल्यास व ते दर वाजवी वाटत नसतील तर निविदा रदद करण्याचा अधिकार अपर जिल्हाधिकारी यांना राहील.

## १५) निविदाकाराने करारनामा न केल्यास

(i) मंजुर निविदाधारकास निविदा मंजुरी नंतर ७ दिवसाचे आत सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर विहित नमुन्यात करारनामा करणे बंधनकारक आहे.

(ii) मंजुर निविदाकाराने विहित मुदतीत करारनामा करण्यास नकार दिल्यास किंवा करारनामा करण्यास टाळाटाळ केल्यास अशा निविदाधारकाची संपूर्ण इसारा रक्कम जप्त करुन लगतच्या न्युनत्तम निविदाकाराची निविदा मंजुर करण्यात येईल.तथापी काही कारणास्तव प्रथम न्युनत्तम निविदाधारक विहित मुदतीत करारनामा करण्यास असमर्थ ठरल्यास व विहित मुदतीनंतर सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन न्युनत्तम निविदाकार करारनामा करण्यास तयार असल्यास शासनाच्या पुर्वसंमतीने अशा निविदाधारकांशी करारनामा करण्यात येईल.

**(iii)** प्रथम न्युनत्तम निविदाकार करारनामा करण्यास असमर्थ ठरल्यास लगतच्या न्युनत्तम निविदाकारांची निविदा मंजुर करण्यात येईल.लगतच्या न्युनत्तम निविदाकाराशी वाटाघाटी करण्यात
येऊन व शासनाच्या पुर्व संमतीने अशा लगतच्या न्युनतम निविदाधारकाशी करारनामा करण्यात येईल. लगतचा न्युनतम निविदाधारकही करारनामा करण्यास तयार नसल्यास निविदा प्रक्रीया रद्द करून फेर निविदा बोलविण्यात येतील. अशा फेरनिविदा प्रक्रियेत पहिल्या निविदेत करारनामा करण्यास नकार देण्याऱ्या प्रथम न्युनतम निविदाकारास प्रतिबंधित केले जाईल.

(iv) करारनामा करण्यास नकार देणाऱ्या तसेच, निविदा सादर केल्यानंतर निविदाकार हा करारनाम्यातील तरतुदींना बांधील आहे. त्यामुळे, लगतच्या न्युनतम निविदाकाराची निविदा मंजूर केल्यामुळे शासनाने वसुल करावयाची अतिरीक्त रक्कम, स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या "पी. एल. आर. अधिक दोन टक्के" _**(Prime Lending Rate)** व्याजासह करारनामा न केलेल्या निविदाकाराकडुन वसुल करण्यात येईल. सदर वसुली जमीन महसुलीच्या थकबाकीची वसुली म्हणुन करण्यात येईल.

(v)यासाठी निविदाकाराकडुन, निविदेसोबत रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर त्यांच्या कडील स्थावर संपत्ती/ मालमत्तेचा तपशिल व सदर मालमत्ता निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत विकण्यात येणार नाही अशा आशयाचे शपथपत्र घेण्यात येईल.

## १६) धान्याची अफरातफर / काळाबाजार करण्यास प्रतिबंध

(i) करारनामा करतेवेळी निविदाधारकाने सादर केलेली मालकीच्या व नियंत्रणाखालील वाहनांची यांदी व्यतीरीक्त वाहतुक दाराने वाहतुकीकरीता अतिरीक्त वाहने उपलब्ध करून दिल्यास अशा वाहनांच्या नोंदनी क्रमांका सह यादीस अपर जिल्हाधिकारी यांची लेखी मान्यता घेणे आवश्यक आहे. अशा वाहनाव्यतिरीक्त अन्य वाहनामध्ये धान्याची वाहतूक करता येणार नाही.

(ii) मान्यताप्राप्त वाहनाव्यतिरीक्त इतर वाहनामधुन वाहतूक केल्यास सदरची धान्यवाहतूक काळयाबाजारात नेण्यासाठी करण्यात येत असल्याचे मानुन संबधित वाहतूक कंत्राटदार, जिल्हा वाहतूक प्रतिनीधी व सर्व संबधितांवर कारवाई करण्यात येईल.

(iii) अन्नधान्याच्या वाहतूकी करीता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या जवळच्या मार्गाव्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने अथवा आड मार्गाने धान्याची वाहतूक करण्यात येवू नये. अन्यथा सदरचे वाहन काळयाबाजारात जाण्याच्या उद्देशाने जात असल्याचे मानुन संबधीत वाहतूक दारावर कारवाई करण्यात येईल. आपत्कालीन परिस्थितीत (उदा. पूर परिस्थिती, अपघात इत्यादी) नियोजीत मार्गा व्यतिरीक्त अन्य पर्यायी मार्गाने वाहतूक करावी लागल्यास वाहतूक दाराने अपर जिल्हाधिकारी यांची लेखी परवानगी घेणे बंधनकारक राहील. अन्य पर्यायी मार्गाने झालेल्या वाहतूकीवर अतिरीक्त खर्च झाल्यास अशा देयकाच्या अदायगीसाठी शासनाची पूर्वपरवानगी घेऊन देयक अदा करण्यात येईल.

(iv) धान्याची वाहतूक करीत असलेल्या वाहनावर फलकाव्दारे **शासकीय धान्य वाहतूक** अशी स्पष्ट उद्‌घोषणा करणे वाहतूक कंत्राट दारांना बंधनकारक राहील अन्यथा एकावेळी रू. १०००/- दंड आकारण्यात येईल. वारंवार उद्‌घोषणा करण्याबाबत टाळाटाळ करणाऱ्या वाहतूकदारावर कंत्राट रद्द करण्याची कारवाई शासन स्तरावरून करण्यात येईल.

(v) सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गतच्या कोणत्याही अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक कंत्राटदाराकडुन अफरातफरीबाबत वर्तमानपत्र, दुरचित्रवाणी इत्यादी कोणत्याही माध्यमातुन बातमी प्रसिध्द झाल्यास त्याबाबत तात्काळ दखल घेवून योग्य कार्यवाही करण्यात येईल.

(vi) वाहतूकीदरम्यान वाहतूक कंत्राटदाराचे प्रतिनिधी, चालक, वाहक इ. यांचेकडुन होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या अफरातफर/ काळाबाजारास सर्वस्वी वाहतूक कंत्राटदारास जबाबदार धरण्यात येईल.

(vii) वाहतूक कंत्राटदाराने त्यांच्या विश्वासातील प्रतिनिधी, परवानाधारक **(Driving Licene)** वाहन चालक, वाहक यांची नेमणूक करावी.

(viii) अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंची अफरातफर/काळाबाजार प्रकरणी वाहतूक कंत्राटदाराचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दोषी आढल्यास आल्यास संबधितांवर जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत गुन्हा नोंदवून पुढील कार्यवाही करण्यात येईल. अशा प्रकरणी वाहतूक कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्याची कारवाई शासनस्तरावरून करण्यात येईल.

(ix) अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचा अपहार/चोरी/ काळाबाजार याची रक्कम वाहतूक कंत्राटदाराकडून बाजारभावाच्या दुप्पट किंमतीने वसुल करण्यात येईल.

(x) वाहतूक कंत्राट कालावधी दरम्याने अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंची अफरातफर / काळाबाजार/ चोरी करणार नाही अशा आशयाचे शपथपत्र निविदाधारकाकडून घेण्यात येईल.

## १७) <u>मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे वाहन भार क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतुक ( ओव्हर लोडींग) न होण्याबाबत करावयाची उपाययोजना</u>

(i) मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिका क्र. १३६/२००३ वरील दिनांक ९/११/२००५ रोजीच्या निर्णयाप्रमाणे वाहनभार क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतुक न करण्याबाबतच्या स्वयंस्पष्ट सूचना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन परीपत्रक क्रमांक कंत्राट १००८/२५८/प्रक्र-९८२/नापु-१६-अ, दिनांक १७ जून, २००८ अन्वये देण्यांत आल्या आहेत.

(ii) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी वाहतुक कंत्राटदाराची राहील. सदर सूचनांचे उल्लंघन झाल्यास संबधित वाहतूक कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्याची कारवाई शासन स्तरावरून करण्यात येईल तसेच संबधितावर कारवाई करण्यात येईल.

(iii) वाहनभार क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक करणार नाही अशा आशयाचे शपथपत्र निविदेसोबत निविदाधारकाकडून घेण्यात येईल.

## १८) अन्नधान्य वाहतूकीच्या वाहनातील इंधनामध्ये केरोसिनचा वापर करण्यास प्रतिबंध

कंत्राट कालावधीमध्ये वाहतूकदाराने त्याच्या मालकीच्या/नियंत्रणाखालील/अतिरीक्त पुरवण्यात आलेल्या वाहनात इंधन म्हणून/ इंधनामध्ये केरोसिनचा वापर करण्यात येवू नये. अशाप्रकारे केरोसिनचा गैरवापर केल्याचे आढळून आल्यास वाहतूकदार, त्याबरोबरच वाहनांना केरोसिन पुरवणाऱ्या व्यक्ती/ वितरकावर जिवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत गुन्हा नोंदवून पुढील कार्यवाही करण्यात येईल. अशा प्रकरणी दोषी आढळणाऱ्या वाहतूकदाराचे कंत्राट रद्द करण्याची कारवाई शासनस्तरावरून करण्यात येईल. निविदेसोबत वाहतूक कंत्राट कालावधीदरम्यान केरोसिनचा गैरवापर करणार नाही अशा आशयाचे शपथपत्र निविदाधारकाकडून घेण्यात येईल.

## १९) डिझेल दरात वाढ अथवा घट झाल्यास दरवाढ/ दर कमी करणे

केंद्र शासनाने डिझेलच्या दरात किंवा केंद्र वा राज्य शासनाने सांविधीक शुल्क वा करात सुधारणा केल्यामुळे वाहतुक कंत्राटाच्या कालावधित डिझेलच्या दरात ५ टक्के पेक्षा अधिक वाढ झाल्यास कंत्राटदारास प्रमाणशिर दरवाढ देण्यात येईल. तसेच, कंत्राटाच्या कालावधित डिझेलचे दर ५ % हून कमी झाले तर त्याप्रमाणात कंत्राटदाराच्या देय रकमेमधुन वसुली करण्यात येईल. या करीता कंत्राटाचा करारनामा करण्याच्या दिवशीचा डिझेल दर आधारभुत गृहीत धरून या दिवशीच्या डिझेलच्या दरात ज्या तारखेपासुन ५ % पेक्षा अधिक दरवाढ होईल/ कमी होईल त्या तारखेपासुन प्रमाणशील दरवाढ देय राहील/ देय रकमेमधुन वसुल करण्यात येईल. प्रमाणशीर दरवाढीचा/ दर कमी करण्याचा निर्णय घेण्यात एक सुत्रता राखण्याच्या दृष्टीने दरवाढीचे/ दर कमी करण्याचे सूत्र शासन निर्णय क्रः कंत्राट १००९/६१४ प्रक्र. ४७/ ना.पु. १६-अ, दि. २१ जुलै, २००९ सोबत जोडलेल्या परीशिष्ट ब मध्ये निश्चित केले आहे. परिशिष्ट ब येथील सुत्रानुसार वाहतुक कंत्रांटदाराच्या देयकातुन करण्याबाबतचे संपूर्ण अधिकार अपर जिल्हाधिकारी यांचे राहतील. ही दरवाढ अथवा वसुली ही कंत्राटाच्या कालावधी पर्यंतच लागु असेल कंत्राटाचा कालावधी संपुष्टात आल्या नंतर कंत्राटदारास दरवाढीबाबत १ महिन्यात अनुज्ञेय रकमेचा दावा करता येईल. कंत्राटाचा कालावधी संपुष्टात येण्यापुर्वी वसुलीची रक्कम कंत्राटदाराच्या देयकातुन रोखुन ठेवण्यात येईल.

## २०) आयकर कपात

(i) भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या दिनांक ८/१०/१९९३ च्या परिपत्रकातील परिच्छेद ५.३ नुसार सर्व प्रकारच्या कंत्राटांना आयकर अधिनीयम, १९६१ च्या सेक्शन १९४ (सी) ची तरतुद लागू आहे त्यानुसार वित्तीय सल्लागार व उपसचिव यांच्या कडील परिपत्रक क्र. का.१/३९८ /७९२२, दिनांक ९ डिसेंबर १९९६, अन्वये व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणा नुसार वाहतूकीच्या देयकातुन केंद्रशासनाच्या प्रचलित नियमानुसार आयकर कपात करण्यात येईल.

(ii) केंद्र शासनाने दिनांक १ जानेवारी, २००३ पासुन वाणिज्यिक कंत्राट घेण्यासाठी निविदा भरतेवेळी कोणत्याही व्यक्तीला आयकर निपटारा प्रमाणपत्र सोबत देण्याची आवश्यकता नाही अशा सूचना सर्व मुख्य आयकर आयुक्तांना दिलेल्या असल्याने निविदेसोबत आयकराच्या पुर्ततेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक नाही.

## २१) वाहतूकदाराने अन्न धान्य व्यपगत केल्यास करावयाची कारवाई

जिल्हा पुरवठा कार्यालयाने आदेशित केल्याप्रमाणे कंत्राटदारास मासीक अन्नधान्य नियतनाची उचल विहीत मुदतीत पुर्ण करणे बंधनकारक आहे. त्यासाठी जिल्हा पुरवठा कार्यालयाच्या आदेशा नुसार कंत्राटदारस दररोज आवश्यक तेवढे ट्रक उपलब्ध करून दयावे लागतील. विहीत मुदतीत अन्नधान्याची उचल न केल्यामुळे व्यपगत झालेल्या अन्नधान्याची बाजारभावाने होणाऱ्या रकमेच्या १० % दंड कंत्राटदाराकडुन वसुल करण्यात येईल. अपर जिल्हाधिकारी यांनी आदेशीत केल्यास शासनाच्या इतर योजने अंतर्गतच्या अन्नधान्याच्या वाहतूकीचे काम सुध्दा करावे लागेल. वारंवार अन्नधान्य व्यपगत करणाऱ्या अकार्यक्षम वाहतूक कंत्राटदारांचे कंत्राट रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल

## २२) वाहतूकदाराची जबाबदारी

(i) धान्य वाहतूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या ट्रकवरील वाहनचालक, क्लिनर व या प्रक्रीयेत लावण्यात येणाऱ्या वराई कामगारांचा विमा उतरविण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. करारनामा करतेवेळी यासंबधिच्या संबधित विमा कंपनीच्या कागदपत्रांच्या प्रती पुराव्या दाखल सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

(ii) वराईची जबाबदारी संबधीत वाहतुक कंत्राटदाराची राहील. म्हणजेच हे कंत्राट मिळणाऱ्या कंत्राटदाराची राहील.

(iii) वाहतूक करतांना येणाऱ्या तुटीस वाहतूक कंत्राटदार स्वतःजबाबदार राहील व येणाऱ्या तुटीची रक्कम वाहतूक कंत्राटदारास दयावयाच्या देयकातुन कपात करून घेण्यात येईल.

(iv) संपुर्ण निविदा अथवा निविदेचा काही भाग कोणतेही कारण न देता स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार अपर जिल्हाधिकारी / शासनाकडे राखून ठेवण्यात येत आहे.

(v) वाहतूक कंत्राटदारास उपकंत्राटदाराची नियुक्ती करता येणार नाही. आवश्यकता भासल्यास कंत्राटदारास पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून दयावी लागेल.

(vi) कामगार भरपाई अधिनियम अंतर्गत वाहतूकीच्या कामासाठी लावलेल्या कामगारांच्या उद्भवणाऱ्या नुकसान भरपाईची सर्वस्वी जबाबदारी वाहतूक कंत्राटदाराची राहील.

(vii) वे-ब्रिज ते गोदामापर्यंत खाली ट्रकच्या वाहतूकीसाठी येणारा खर्च ठेकेदारास सोसावा लागेल.

## २३) करारनाम्यातील तरतुदीसंदर्भात वाद विवाद व अपील

करारनाम्याच्या कालावधीत किंवा तद्नंतर करारनाम्यातील तरतुदीसंदर्भात तसेच दंड वसुली इत्यादी संदर्भात अपर जिल्हाधिकारी व वाहतूक कंत्राटदार यांचेमध्ये कोणताही विवाद उद्भवल्यास, अपर जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या निर्णया विरूध्द निर्णय दिल्याच्या दिनांका पासुन ३० दिवसात वाहतूक कंत्राटदार संबधित उपआयुक्त (पुरवठा) यांचेकडे दाद मागु शकेल. उपआयुक्त पुरवठा यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास आदेश पारीत झालेल्या दिनांका पासुन ३० दिवसात उपआयुक्त (पुरवठा) यांच्या निर्णया विरूध्द वाहतूक कंत्राटदार शासनाकडे अपिल करू शकेल. अशा प्रकरणी शासनाचे अर्धन्यायिक अधिकार मंत्री, (अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) यांना राहतील. शासनाने दिलेला निर्णय अंतिम राहील आणि तो दोन्ही पक्षांना बंधनकारक राहील. वाहतूक कंत्राटदाराने करारनामा संपल्यानंतर जास्तीत जास्त ६ महिन्यात करारनाम्यातील तरतुदी संदर्भात दाद मागू शकेल.

२४) “अन्नधान्य वाहतूकी दरम्यान होणा-या गैरव्यवहाराला आळा घालण्याच्या दृष्टीने शासन स्तरावरुन **GPS ( Global Position System )** यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत निर्णय

झाल्यास, सदरची **GPS** यंत्रणा व ही यंत्रणा वाहनावर लावण्यात येणारा अनुषंगीक खर्च करणे वाहतुकदारांना बंधनकारक राहील. “

**२५)** कोणतीही निविदा अथवा निविदेचा काही भाग स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार अपरजिल्हाधिकारी जळगांव यांनी राखून ठेवलेले आहे, याची निविदाकाराने नोंद घ्यावी.

(गणेश पाटील)

दिनांक : ०४/११/२००९ अपर जिल्हाधिकारी, जळगांव

टिप :- लिफाफा सिलबंद करुन त्यावर निविदाधारकाचे पूर्ण नाव पत्ता,दुरध्वनी क्रमांक लिहावा.व त्यावर निविदाकाराने स्वाक्षरी करावी.लिफाफ्यावर मोठया अक्षरात “ लिफाफा -अ “ असे नमुद करावे.व “.जळगांव जिल्हयाकरीता जिवनावश्यक वस्तूंच्या वाहतूकीची निविदा“ असे स्पष्ट नमुद करावे

क्रं पुरवठा/हिशोब/कावि/ / २००९
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय
जळगांव दि ०४.११.२००९

प्रतिलिपी
१) मा. सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई - ३२ यांना माहितीस्तव सादर.
२) मा. उप आयुक्त, (पुरवठा) नाशिक विभाग नाशिक यांना माहितीस्तव सादर.
३) मा. वित्तीय सल्लागार व उपसचिव अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई - २०
४) मा. महालेखाकार, नागपुर - २
५) मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांना माहितीस्तव सादर
६) जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, एन.आय.सी कार्यालय जळगांव यांना निविदासूचना संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याकरीता अग्रेषित.
७) जिल्हा माहिती अधिकारी जळगांव यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी
८) तहसिलदार, -------------------------- यांना निविदा नोटीस बोर्डावर आवश्यक प्रसिध्दीसाठी.
९) जिल्हा पुरवठा अधिकारी ---------------- यांना
२/- सदर निविदा आपले नोटीस बोर्डावर लावून त्यास प्रसिध्दी द्यावी.

## परिशिष्ट - अ

## लिफाफा -अ- मध्ये (तांत्रिक लिफाफा) सादर करावयाच्या कागदपत्रांची सूची

| अ.क्र. | कागदपत्रांची सूची |
|---|---|
| १ | परिशिष्ट क मधील पत्र |
| २ | भागीदारी फर्म / सहकारी संस्थाचा नोंदणी दाखला, नियमावली व भागीदारी पथक |
| ३ | जिवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ खाली गुन्हा दाखल होऊन दंड अथवा शिक्षा झाली असल्यास / नसल्यास त्यासंबंधीचे शपथपत्र |
| ४ | अनुभव प्रमाणपत्र |
| ५ | वाहतूक कंत्राट कालावधी दरम्यान अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंची अफरातफर / काळाबाजार/ चोरी करणार नाही अशा आशयाचे शपथपत्र |
| ६ | भागीदार / संचालक / सभासद अन्नधान्य वाहतूकीसाठी संपूर्ण कंत्राट कालावधीकरीता वाहने उपलब्ध करून देतील, अशा आशयाचे शपथपत्र |
| ७ | मालकीच्या व नियंत्रणखालील वाहनाचे आर. सी. बुक व फिटनेस प्रमाणपत्राची (संबधित सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या) साक्षांकित |
| ८ | निश्चित केलेल्या संख्येइतके मालकीची वाहने तसेच नियंत्रणाखालील वाहने असल्याबाबतचे शपथपत्र |
| ९ | वाहतूक कंत्राट कालावधी दरम्यान वाहनभार क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतुक करणार नाही अशा आशयाचे शपथपत्र |
| १० | वाहतूक कंत्राट कालावधी दरम्यान वाहनात इंधन म्हणून/ इंधनामध्ये केरोसिनचा गैरवापर करणार नाही अशा आशयाचे शपथपत्र |
| ११ | भागीदारी संस्था / सहकारी संस्थांचे भागीदार / संचालक / सभासद अन्नधान्य वाहतूकीसाठी संपुर्ण कंत्राट कालावधीकरीता ट्रक्स उपलब्ध करून देतील, अशा आशयाचे शपथपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील |
| १२ | निविदे सोबत सादर केलेले स्वतःच्या मालकीची वाहने व नियत्रणाखालील वाहने संपूर्ण कंत्राट कालावधील दुसऱ्या जिल्हयातील तसेच इतर कोणत्याही वाहतुकीच्या कंत्राट / करारनाम्यासाठी उपयोगात आणले नसल्यासंबधीचे शपथपत्र |
| १३ | नियंत्रणाखालील वाहन मालकाचे, वाहतूकीसाठी वाहने संपूर्ण कंत्राट कालावधी करीता उपलब्ध करून देण्यासंबधीचे शपथपत्र |
| १४ | इसारा रक्कम चलनाने भरली असल्यास चलनाची प्रत किंवा इसारा रकमेचा डिमांड ड्राफ्ट |
| १५ | निविदा मंजुर झाल्यास निविदा सुचनेत नमुद केलेल्या रकमे एवढी प्रतिभूती ठेवी, बँक गॅरंटी व महसुल एपत प्रमाणपत्र / गॅरंटी देण्यात येईल असे शपथपत्र |
| १६ | शासन निर्णय दि.२१ जुलै २००९ मधील सर्व तरतुदी, अटी व शर्तींना बाधील असेल अशा आशयाचे शपथपत्र |

टिप - (वरील कागदपत्रे एका लिफाफ्यात सिलबंद करुन त्यावर निविदाधारकाचे पुर्ण नाव पत्ता,दुरध्वनी क्रमांक लिहावा.व त्यावर निविदाकाराने स्वाक्षरी करावी. लिफाफ्यावर मोठया अक्षरात “ लिफाफा -अ “ असे नमुद करावे व “जळगांव जिल्हयाकरीता जिवनावश्यक वस्तूंच्या वाहतूकीची निविदा“ असे स्पष्ट नमुद करावे.

**परिशिष्ट - ब**

**लिफाफा ब ( दरपत्रक)**

**वाहतुक दराचा (व्यापारी दराचा लिफाफा) मध्ये सादर करण्यासाठी**

| |
|---|
| निविदा फॉर्मची किंमत रू. १०,०००/- चलन क्र. ---------------- दिनांकः / /२००९<br>निविदा क्रमांक : ---------------- निविदा फॉर्म वितरीत केल्याचा दिनांकः / /२००९<br>निविदाधारकाचे/फर्मचे/भागीदारी संस्था/सहकारी संस्थेचे नांव - -------------------------------------<br>------------------------------------------ पत्ता ----------------------------------------------<br>------------------------------------- दुरध्वनी क्र. -------------------------------------------<br><br>जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>जळगांव |

**जिल्हातील वाहतुकीच्या अंतराचे टप्पे व आधारभूत दराच्या कमी / अधिक टक्केवारीमध्ये निविदाधाराकाने खालील तक्त्यामध्ये रकाना क्र. २ मध्ये दर नमूद करावे. (सर्व टप्प्यांकरीता एकच दर मुळ दराच्या कमी/ अधिक टक्केवारीमध्ये नमूद करावा)**

| वाहतुकीच्या अंतराचे टप्पे व टप्पेनिहाय आधारभूत दर | आधारभूत दराच्या कमी/अधिक टक्केवारीमध्ये निविदाधारकाने दिलेले दर | |
|---|---|---|
| | अंकात दर | अक्षरी दर |
| ० ते २ कि.मी - रू. ३० प्रति टन (संपूर्ण अंतराकरिता) | | |
| २ ते १० कि.मी - रू. ६ प्रति टन प्रति कि.मी. | | |
| १०ते ५० कि.मी. - रू. ४.८० प्रति टन प्रति कि.मी. | | |
| ५० किमी च्या पुढे - रू. ३ प्रति टन प्रति कि.मी. | | |

दिनांक :

स्वाक्षरी : ------------------------

निविदाधारकाचे नांव :------------------------

फर्मचा शिक्का :

टिप :- दरपत्रकाचा लिफाफा सिलबंद करुन त्यावर निविदाधारकाचे पुर्ण नाव पत्ता,दुरध्वनी क्रमांक लिहावा.व त्यावर निविदाकाराने स्वाक्षरी करावी.लिफाफ्यावर मोठया अक्षरात " लिफाफा -ब " असे नमुद करावे.व ".जळगांव जिल्हयाकरीता जिवनावश्यक वस्तूंच्या वाहतूकीची निविदा" असे स्पष्ट नमुद करावे.

# परिशिष्ट-क
# आंतर जिल्हा व जिल्हा अंतर्गत वाहतूक निविदा

निविदाकाराचे नांव व पत्ता :- ------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------

प्रति

**मा. अपर जिल्हाधिकारी जळगांव**

**विषय :- अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचे वाहतुकीसाठी सन २००९ -२०१२ या कालावधिसाठी निविदा**

**संदर्भ** :- आपले कडील निविदा क्र. पुरवठा कंत्राट/ कावि/ २६१ /२००९ दिनांक ४/११/२००९ चे दैनिक लोकमत व सकाळ मधील प्रसिध्द झालेली निविदा...

**महोदय,**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपणा कडुन अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंच्या, सन २००९-२०१२ याकालावधीसाठी, जळगांव जिल्हयाकरीता आंतर जिल्हा व जिल्हा अंतर्गत वाहतूक कामी निविदा संदर्भात दि. ४/११/२००९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या निविदा प्रसिध्दीच्या अनुषंगाने, मी/आम्ही शासकीय अन्नधान्य व इतर जिवनावश्यक वस्तुंची वाहतुक करणेमी निविदा सादर करीत आहोत.

१) मी / आम्ही निविदामधील नमुद केलेल्या महत्वाच्या अटी तपासल्या असुन समजुन घेतल्या आहेत. तसेच आपल्या कार्यालयातील करारनाम्याचा आदर्श नमुना तपासला असुन, त्याच्याशी आम्ही सहमत आहोत.

२) आम्ही परिशिष्ट ब मध्ये नमुद केलेल्या वाहतुक दराने काम करणेस तयार आहोत. परिशिष्ट ब मध्ये नमुद केलेल्या दराव्यतीरीक्त इतर कोणतेही दर आम्हाला देय नसतील याच्यांशी, मी / आम्ही बांधील आहोत.

३) निविदेच्या शर्ती व अटी नुसार रक्कम **इसारा रक्कम Earnest Money Amount** रूपये **३८,००,०००/- अडोतीस लक्ष मात्र** जमा करण्यात आली असुन, त्याची चलन क्र .----------------- दिनांक / / , डी.डी.क्र. ----------------- दिनांक /११/२००९ बँकेचे नांव ---------------- ---------------------------- सोबत जोडलेला आहे.

४) मी/आम्ही घोषीत करतो की, निविदे मध्ये व सोबतच्या प्रपत्रात जी माहिती नमुद केली आहे व कागदपत्रे जोडली आहेत ती खरी आहे. मी/आम्ही जो प्रतिनिधी नियुक्त करु, त्याचा प्रत्येक कृतीला, आम्ही बांधिल आहेत.

श्री ---------------------------------------- रा. ----------------------------------------------------

जिल्हा---------------------- यांना आम्ही आमचे फर्म/संस्था ---------------------------------------------

यांची प्रतिनिधी म्हणुन नियुक्ती केलेली आहे. त्याची सोबत नमुना स्वाक्षरी जोडलेली आहे. जर यात काही बदल झाल्यास, आम्ही मा. अपर जिल्हाधिकारी यांना कळविणेची तजविज केलेली आहे.

५) निविदे सोबत पुर्णपणे भरलेली सही व शिक्यानिशी सर्व कागदपत्रे जोडलेले आहेत.

-------------------
प्रतिनिधीची स्वाक्षरी

दि.      /११/२००९.

**आपला विश्वासु,**

निविदाकाराची सही
हुद्दा : ------------------------------
नांव : ------------------------------
पत्ता : ------------------------------
------------------------------
------------------------------

---

**टिप :- तांत्रिक लिफाफा अ  आणि  दराचा लिफाफा ब हे दोन्ही स्वतंत्र लिफाफे वेगवेगळ्या पाकिटात सिलबंद करुन एका मोठया पाकीटामध्ये टाकावे व मोठे पाकीट देखील सिलबंद करावे.  (प्रत्येक पाकीटावर जळगांव जिल्हयाकरीता जिवनावश्यक वस्तूंच्या वाहतुकीची निविदा असे स्पष्ट नमुद करावे)**